## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११००४

# जाहीर प्रकटन

प्रस्तूत जाहीर प्रकटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते, की महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (ज्यांचा उल्लेख या पुढे 'बालभारती' असा केला जाईल) इयत्ता पहिली ते बारावीसाठी पाठ्यपुस्तक व शैक्षणिक साहित्याची छपाई, संशोधन व निर्मिती करते. बालभारतीकडे या साहित्याचे प्रकाशन हक्क (कॉपीराईट) आहेत. बालभारती ही तिच्या प्रकाशनांच्या कॉपीराइटची एकमेव मालक आहे. ज्यात साहित्य, मजकूर, समीक्षण, भाषांतर, चित्रे, डिझाइन, लेआऊट आणि संकलने यांचा समावेश असून ते कॉपीराइट कायदा, १९५७ अंतर्गत संरक्षित आहेत. बालभारतीच्या कॉपीराईट पॉलिसी अंतर्गत प्रकाशित केलेल्या पाठ्यपुस्तकांवर आधारित शैक्षणिक पूरक साहित्य (छापील/डिजीटल/सोशल मिडिया) प्रकाशित करणाऱ्या व्यक्ती/संस्था/कोचिंग क्लासेस यांनी बालभारतीकडे निर्धारित नोंदणी शुल्क भरुन परवाना घेणे बंधनकारक आहे.

ज्यांनी बालभारतीकडे अजून नोंदणी केलेली नसून त्यांचे साहित्य परवान्याशिवाय बाजारात वितरित करत आहेत. या प्रकटनाद्वारे अशा सर्वांना कळविण्यात येते की, आपले बालभारतीच्या पाठ्यपुस्तकावर आधारित विनानोंदणी साहित्य आपण सदर प्रकटन जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत करून घ्यावे तसेच आवश्यक परवाना शुल्क भरून परवाना काढण्यात यावा. तसेच ज्या व्यक्ती/संस्था/कोचिंग क्लासेस यांनी या आधी नोंदणी केलेली आहे, मात्र त्यांचा परवाना अवधी समाप्त होत आहे किंवा झालेला आहे, त्यांनीही सदर प्रकटन जाहीर झाल्यावर १५ दिवसांच्या आत आपल्या परवान्याचे नूतनीकरण करुन घ्यावे अन्यथा आपणांवर कॉपीराइट व इतर लागू असलेल्या कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

बालभारतीच्या असे निदर्शनास आले आहे, की अशा प्रकारचा व्यवसाय करणाऱ्या काही व्यक्ती/संस्था/कोचिंग क्लासेस/प्रकाशक/डिजिटल प्लॅटफॉर्म हे बालभारतीची पाठ्यपुस्तके तसेच शैक्षणिक साहित्यांची अनधिकृत प्रतिलिपी, स्कॅनिंग, पुनरुत्पादन, डिजिटायझेशन, विक्री, वितरण आणि व्यावसायिक वापर करत आहेत. या जाहीर प्रकटनाद्वारे सर्व संबंधितांना सक्त ताकीद देण्यात येत आहे, की त्यांनी अशा कोणत्याही अनधिकृत कृती तात्काळ थांबवाव्यात. बालभारतीच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्था कठोर दिवाणी आणि फौजदारी कारवाईस पात्र असेल. ज्यामध्ये मनाई हुकूम, उल्लंघन करणाऱ्या साहित्याची जप्ती, नुकसानीची वसूली आणि कायद्यानुसार खटला चालवणे यांचा समावेश आहे.

बालभारती अशा उल्लंघनावर सक्रियपणे लक्ष ठेवून आहे आणि कोणतीही पूर्वसूचना न देता अशांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करेल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. नोंदणीकृत परवानाधारकांची यादी बालभारतीच्या ebalbharati.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

या संदर्भात आपणांस काही शंका/तक्रार असल्यास श्री. योगेश लिमये, ईडीपी व्यवस्थापक तथा सदस्य सचिव, कॉपीराईट पॉलिसी पुनरावलोकन समिती, बालभारती, पुणे यांना कार्यालयीन वेळेत या ९४२२०५८१७२, ०२०–२५७१६३२३ मोबाईल क्रमांक वर वा इमेल copyright@ebalbharati.in वर संपर्क साधावा.

क्रमांक :

दिनांक :

संचालक

पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे